१९९३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६१०

# उधाण, ओहट, भरती

★

REFBK-0013478
REFBK-0013478

दत्तात्रय गोविंद कुळकर्णी

# उधाण, ओहट, भरती

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८६३ * वि: काव्य
क्रमांक ९६९८ को. वि.

९३८६८

REFBK-0013478
REFBK-0013478

दत्तात्रय गोविंद कुळकर्णी

किंमत १-५०

प्रकाशक :—
सौ. इंदिरा दत्तात्रय कुलकर्णी
गोवर्धनदास बिल्डिंग
गिरगांव, मुंबई ४

प्रकाशन दिनांक ता. २८-९-६३

मुद्रक :-
लक्ष्मीबाई नारायण चौधरी
निर्णयसागर प्रेस, डॉ. वेलकर स्ट्रीट,
२६-२८, मुंबई नं २

# दोन अभिप्राय

## ( १ )

श्री. दत्तात्रय गोविंद कुलकर्णी यांचा हा काव्यसंग्रह अचानक माझ्या हातीं आला; आणि तो वाचून आनंद झाला. 'उधाण, ओहट, भरती' यांतील प्रत्येक लाट निरनिराळी सुखद संवेदना काव्यरसिकाच्या मनांत निर्माण करते. आणि आजकालच्या जमान्यांत उदात्त व शांत रस यांचें फारसें दर्शन घडत नाहीं. काव्य बुद्धीवादी बनत चालल्याची ओरड ऐकू येते पण त्यांतील आर्तता, जिव्हाळा मात्र थिटा पडतो. अशा वेळीं जुन्या संप्रदायांतील संतकवींची परंपरा नवीन थाटांत आपल्या पुढें आली तर अनपेक्षिततेमुळें आश्चर्याबरोबर आनंदहि प्राप्त होतो. बा. भा. पाठक यांच्या "ओढणी" नंतर प्रथमच या प्रकारच्या काव्याचा आस्वाद घेण्यास मिळाला. विशिष्ट ध्येयवादानें, व्यक्तीच्या जीवनाबरोबर विकसित होणाऱ्या तत्त्वज्ञानानें या काव्यावर आपला ठसा उठविला आहे.

एक प्रकारच्या उदात्त मानसिक शांतींतून या काव्याचा जन्म झाला असावा, त्यामुळें त्याला अथांग, आणि अगाध सागराची उपमा द्यावी लागेल. त्यांत ओढ्याची खळबळ नाहीं, किंवा धबधब्याचा आवेश नाहीं. एक प्रकारची तृप्ति आणि तुष्टी त्यांतून सतत डोकावतांना दिसते. जीवनांतील लढा, संघर्ष संपल्यावर एक प्रकारच्या अलिप्तपणानें त्याचें निरीक्षण करणाऱ्या योग्याची वृत्ति त्यांत प्रतिबिंबित होते. स्वतःच्या सुखदुःखांचा, आशानिराशांचा गुणदोषांचा, यशापयशांचा उल्लेख, त्यांतील कडवटपणा विरवून केल्यामुळें त्याला भव्यत्व

प्राप्त झालें आहे. 'Poetry is the criticism of life'. हें वचन या काव्यास निराळ्या अर्थानें पूर्णांशानें लागू पडतें. यांतील शृंगार हा शुद्ध, संयमित उदात्त व पुरुषार्थपूरक साधला आहे. पत्नी-विषयींची भावना आदर्श आहे. त्या पुढील सवाल जवाब (४७ ते ५१) बुद्धीची चमक दाखवितात. ६० ते ९१ वगैरे कडवीं सुभाषित म्हणून कोठेंहि उल्लेखण्यासारखीं आहेत. उत्तरार्धांत मृत्युविषयीं केलेला विचार कोणत्याहि तत्त्वज्ञान्याच्या विचारांना साजेसाच आहे. (६६-७५) परमेश्वरावरची कवीची अचल निष्ठा आहे. (मात्र ७८ या कडव्या सारखीं शब्दच्छलावर आधारित कडवीं गाळलीं तरी चालतील) काव्यांच्या उत्तरार्धांतील गूढता मनाला एक प्रकारची हुरहुर लावते. एकंदर काव्य-संग्रह वाचल्यावर त्यांतील अनेक नवनव्या कल्पना मनाला रिझवितात. त्यांतील ओळी गुणगुणाव्याशा वाटतात व मन आंतरिक समाधानानें न्हाऊन निघतें. प्रवाही, ओघवती व साधी रचना प्रसादयुक्त आहे. चिंतनशीलता हा या काव्याचा आत्मा आहे, किंबहुना कवीनें आपल्या जीवनाचें सार पुढिलांसाठीं काव्य-कुपींत भरून ठेविलें आहे. जीवनांतील क्षणिक सुखदुःखांचा विसर पडावा, संकटांतील भयानकता नष्ट व्हावी व जीवननौका विशिष्ट ध्येयदीपाच्या सहाय्यानें इच्छित स्थळीं पोंचावी, असें सामर्थ्य या काव्यांत दिसतें आणि हाच या काव्याचा प्रधान गुणविशेष.

ता. २९।१२।५९

**मो. व्यं. पेठे**

प्रा. सेंट झेविअर्स कॉलेज

दा. क्र. ९३८६८

## (२)

## 'उधाण, ओहट, भरती.'

या संग्रहांतील प्रत्येक पृथमात्मक कविता म्हणजे कवीच्या चिंतनशील मनांत प्रसंगोपात्त उठलेला एकेक विचार-तरंग आहे. कित्येक ठिकाणीं या तरंगमालिकेंत एकाच भावनेंतून निर्माण होणारी संगति व परस्परसंलग्नता आढळते तर त्यांतील कित्येक विचार-तरंग स्वयंपूर्ण वाटतात. प्रस्तुत कवि हा फारशी भाषेचा पंडित आहे या जाणीवेमुळें हा संग्रह उमरखय्यामच्या रुबायांच्या धर्तीवर तर रचलेला नसेल, अशी कल्पना मनाला चाटून जाते. आणि 'बांग' 'बुल्बुल' लाट २५ मधील 'मद्य' 'गीत' वा 'वाद्य,' लाट ९३ मधील 'काल' 'आज' 'उद्यां' वरील कल्पना व लाट २१ ते ३८ बाहुपाशांत धरलेल्या प्रियेला उद्देशून काढलेले उद्गार रुबायांची आठवणहि करून देतात परंतु वरवर दिसणारें हें साम्य एवढ्या पुरतेंच मर्यादित आहे. हा कवितासंग्रह वाचून मनावर जो संकलित ठसा उमटतो तो उमर खय्यामच्या निराशावादांतून निर्माण झालेल्या भोगवादाहून सर्वस्वी निराळा आहे. कवीचें मन हिंदुसंस्कृतींतूनच विकास पावलेलें आहे व त्यामुळें त्यांत हिंदुतत्त्वज्ञानाचाच आविष्कार आढळतो. तेव्हां तसें पाहिलें तर या संग्रहाचें नातें रुबायांपेक्षां भर्तृहरीच्या नीतिशतकाशींच अधिक जवळचें लागतें. कवीचें आर्त मन अंतर्मुख होऊन जीवनाचा गूढ गर्भ अर्थ शोधून काढण्यांत गर्क झालेलें दिसतें. जीवनांतील नानाप्रकारच्या समस्या त्याच्या मनाला भंडावून सोडतात; त्यांतील अनेक शल्यें त्याच्या मनाला टोंचतात; पण असें असूनहि परमेश्वरावर त्याचा अढळ विश्वास असल्यामुळें त्याच्या उद्गारांत कडवटपणाऐवजीं श्रद्धायुक्त समाधानांतील आत्मानंदच विशेषें करून

प्रत्ययाला येतो. या श्रद्धेमुळेंच दारिद्र्य, दुष्टपणा, पापवासना, वार्धक्य, मृत्यु इत्यादि आयुष्य भेसूर करून टाकणाऱ्या घटनांनी न डगमगता कर्तव्यतत्परतेचाच तो पुरस्कार करतो. कवीची विनोदबुद्धि क्वचित् कुठं डोकावीत असली तरी त्याच्या अंतर्मुख व चिंतनशील मनाला एक प्रकारची स्थिरता आल्यासारखी वाटते. ही स्थिरता दुबळ्या असहायतेची निदर्शक नसून निश्चयाची निदर्शक आहे. हा या कविता संग्रहाचा सर्वांत मोठा गुण आहे.

ता. ४।९।६०

वि. ह. कुळकर्णी,
प्रा. रुइया कॉलेज.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3६८६3 वि: काव्य
क्रमांक १६९८ नों. दि. ७।५।६८

# उधाण, ओहट, भरती

## लाट १ ली

कुणि पुसे सागरा, 'उधाण, ओहट, भरती-
कां तुझ्यांतरीं ही अखंड खळबळ भलती?'
तो रत्नाकर त्या म्हणे, 'यांविना असतों
मीं कूप, तळें वा असाच कुणितरि जगतीं.'

## लाट २ री

आणिलें इथें मज पुसूनि कां मम मर्जी?
अन इथुनिहि नेतिल नसलों जरी मी राजी
मुक्कामीं मम येथील दीर्घ वा अल्प-
राहील तरी कां सत्ता मजवरि माझी?

## लाट ३ री

गुण अंगिं माझिया अणुही तुज ना दिसला
लवही न तुझ्यांतरिं अवगुण मज आढळला.
नच असणें जगिं मम बरेंचि नसण्याहून?
तूं कसें नसावें शिकसी बघुनिच मजला.

लाट ४ थी

मम अंगीं दडले अधिक तयांहुनि दोष
तव मुखीं जयांचा उल्लेखचि सोल्लास !
अन कितीक करिती स्तुति त्या गुणसुमनांची
भासला न कधिं मन्मना जयांचा वास !

लाट ५ वी

कितिकांनीं मज दाखविला पथ मी त्याचा
अवलंब करुनि लक्ष्यांश साधला साचा.
अन टाकुनि पथ कितिकांनी म्हटलें, 'जाच'
वांचलों, न शंका ऋणि मी त्या दोघांचा.

लाट ६ वी

किति म्हणति आप्त, 'हा उधळट, मूर्खचि साचा'
अन कितीक परके, 'कंजुष कीं हा लुच्चा.'
ते आप्त जाणती धन-संग्रह मम शून्य-
परक्यांस गमें करि संचय हा द्रव्याचा.

लाट ७ वी

किति म्हणती, 'जगणें तुझें निरर्थक झालें
धन संचित नाहीं संसारीं त्वां केलें.'
मीं कमवीं धन मज्जीवन-साधन म्हणुनी-
जगिं मृतचि सधन जो हो निज जीवन-मोलें.

लाट ८ वी

मज पुससी, 'कां धन-संचय नच केलास?'
नच सांठविशीं कां जल जा पूस नदीस'
'धन-संग्रह' म्हणसी, 'संकटिं ये बहु कामीं'
मीं बघें संकटीं' धनसंग्रहकारास.

लाट ९ वी

कुणि म्हणति, 'तुझें सुज्ञत्व सकल जगिं वाया
जरि विसरलास धन कसें तरी कमवाया-
तुज ज्ञानास्तव देतील सुजन जरि मान-
नमवील मान तव निर्धनता जनिं दुसऱ्या.''

### लाट १० वीं

सत्कर्मं प्रभुजी! अल्पचि मम या जगतीं
अन इतर किती? नच सुकर जयांची गणती!
आमरण बोंचुं दे तीव्रचि मनिं ही चूक
मग रुचेल तुज ती द्यावी गति मज अंतीं.

### लाट ११ वी

किति कर्मं केलीं लाजिरवाणी त्यांची
नच दाद कुणासहि कृपाचि प्रभु तव साची
परि पाहिलेस मज करतां जगिं तीं सर्व—
ही लाज मन्मनीं छळण्या सज्ज पिशाची.

### लाट १२ वी

मम मरणोत्तर ना स्वर्ग, नरक मज खास!
मीं इथेंचि अनुभविं यास कधिं नि कधिं त्यास.
कृति करतां कांहीं स्वर्गचि मन्मनिं भरला,
अन दुजी मना दे रौरव नरकीं वास!

लाट १३ वी

रडतांहि हृदय हो शक्य मुखींचें हसणें
नच अशक्य मनिंची व्यथाहि मधु-वचिं लपणें
परि करिशिल निज दारिद्र्य झांकण्या ऐट-
तरि रडविल जग तुज उपहासात्मक वचनें.

लाट १४ वी

कधिं अंतरीं माझ्या शिरे निराशाभूत
गर्भांतचि करण्या ठार मनींचे हेत
परि पसार क्षणिं हो ऐकतांचि तो मंत्र-
जपण्यास देइ जो मला दिव्य कुणि दूत.

लाट १५ वी

जे विचार बहुविध अंतरिं मम उद्भवले-
मनिं मलिन दडुनि ते विमल प्रकट जनिं झाले !
किति लाज अग्नि जें भस्म करिल हा दुर्ग-
दुर्गंधें जर हें गुपित निराश्रित फुटलें.

लाट १६ वी

जगिं बघुनि जोंवरीं मन्मन बहुताचि हर्षें
तीं त्याग, सत्य, नी स्नेह-कृतींचीं दृश्यें
मी सहन करिन जे घण निष्ठुर नियतीचे
नित वर्षति शिरिं या ऐरणिं घांवचि जैसे।

लाट १७ वी

घे उंच भरारी मन्मन अन मीं पाहीं
तें दिव्य कांहिं जें दुज्याच पळिं ना साहीं
मग पडुनि खालिं मीं, रडें अंतरीं ज्यास-
हा भास, सत्य कीं स्वप्न कळें ना कांहीं !

लाट १८ वी

उड्डाण करिशि मज स्वयेंच्चि घेउनि वरती
अन दाविशि दृश्यें भान लुप्त जीं करितीं
मन्मानस-गरुडा ! लज्जित मीं अनिवार-
हा भार जडचि मम मंद करी त्वत्प्रगति !

### लाट १९ वी

किति अथांग दर्या, वादळि लाटा, वारे
अंधार भवति अन भयाण वरती सारे !
मी भ्यालों छे ! मन्नौका गांठिल तीर-
हा धीर मज प्रभो ! कर्णधार ज्या तूं रे !

### लाट २० वी

जलविहार करण्या, करण्या गगनोड्डाण
मी शिकलों, गमलें किति मद्बल, विज्ञान !
परि कां जगिं येणें, पुनरपि जाणें कोठें ?
करि मूढ मला हें गूढ वृथा अभिमान !

### लाट २१ वी

किति युगें लाडके ! धुंडुनि, विश्वें झालीं
ही दोन जिवांची भेट सुमंगल कालीं
निज सुधा-प्रयोगें अमरचि करि हा योग
ना कळे कुणा तो क्रूर झडप कधिं घाली

लाट २२ वी

सखि घेउनि मत्कर कलवी शिर मत्स्कंधीं
अन भरवि मदंतरीं निज नयनींची धुंदी.
मनिं भूत तुझें वा भविष्य नुरलें काला !
बंदिस्त तुझी हो ! गति या ब्रह्मानंदीं.

लाट २३ वी

तव सन्निध सुभगे ! नको मद्य, वा गीत,
संगीत वचिं तुझ्या, कैफहि त्या दृष्टींत !
नच कुबिरासनही गोड मजसि तूं नसतां,
तव विरहा त्रिभुवनिं तूंचि तोडगा फक्त ।

लाट २४ वी

नच नटण्याविण ज्या सुटका भरण्या नयनीं
अन शृंगारचि ज्या अवश्य ठसण्या स्मरणीं
तें रूप न सगुणे ! रूप-ध्यास जो निर्मी-
त्या भास-रूप तनु-शोभा वरची करुनी !

लाट २५ वी

जिस हृदय व्हावया धुंद लागतें मद्य
अन मना कराया मुग्ध, गीत वा वाद्य
ती प्रीत न सजणे ! रीत तिच्या सोंगाची
ज्या अवश्य जगण्या जलशाचें या खाद्य.

लाट २६ वी

तूं नसतां जवळीं तुझीच ना मज ओढ !
वद काय जगीं या तव विरहीं मज गोड !
जिवलगे ! हीच ना खूण प्रीतिची खास-
मम दिलास अवघ्या तुझ्या दिलाची जोड.

लाट २७ वी

हो हर्ष मला जो सर्व गमे तुज द्यावा,
तव दुःखभार निज शिरीं सहर्षचि घ्यावा.
संवगडे ! हीच ना खूण प्रीतिची खास-
मन्मना निरंतर ध्यासचि हा लागावा !

### लाट २८ वी

तव कळी उमलतां मन्मन-बुल्बुल हांसे
दिसतांचि मलुल अन शल्य मदंतरि खुपसें
प्रियतमे ! हीच ना खूण प्रीतिची खास-
तुज बघतां कधिं मज होय तसें कधिं ऐसें !

### लाट २९ वी

क्षणिं त्याच पुकारी दैव झुंज अपुणांशीं
संलग्न तूं नि मीं होतां एक दुज्याशी
परि दिल एकीची गांठ सैल ही होतां-
खल चुरडिल दोघां, निश्चित चुटकीसरशी.

### लाट ३० वी

होवोत कितिहि ते जन्म-मृत्यु नच पर्वा
प्रति जीवन अन तें दाहक कीं जणुं वणवा !
आपत्ति सर्व या सुसह्य जरि मज देशीं-
तूं जन्मोजन्मीं हाचि सौगंडी देवा।

## लाट ३१ वी

तूं माझी अन मी तुझाचि सर्वेहि कालीं
प्रभु-कृपेंचि शुभ ही घटना मंगल झाली !
निःशंक सौंगड्या ! एक साथ दोघांस–
गांठणें तीर वा तळास मिळणें खालीं.

## लाट ३२ वी

तुज बघतां गमलें रत्नपूर्ण ही खाण
मजलाचि मिळो जरि यांत खर्च हो प्राण !
किति भाग्यवान हा प्राण शतहि जरि पडते–
अपुरेंच मूल्य तव, तुझीच सगुणे ! आण.

## लाट ३३ वी

तव विरहीं खचितचि सुसह्य हो मज मरणें
परि मान्य मुळिंच ना मूर्तिस तव विसरणें
अन नसतां तूं त्वत्स्मरण-मूल्य देऊन–
जगिं अन्य काय तें उचित द्यावया सजणे !

लाट ३४ वी

प्रति विरहिं विमल त्वत्स्मृतिचा मन्मनिं वास
दरवळवी अपुल्या मीलनिं नित्य सुवास
मी अधिक प्रभावी कुणास मानूं शुभदे !
तव कृतिंस हृद्य वा सुरम्य तव मूर्तीस !

लाट ३५ वी

तव संग सखे हो कुंज वनीं मज रमणें
ना शक्य ज्यांतरीं ताप-बीज अंकुरणें,
अन तुच्छ यापुढें निश्चित स्वर्ग-विहार
तव हास्य जाणतें स्वर्ग नवानव करणें.

लाट ३६ वी

ना देशि जोंवरी आणिक एकचि गोड
सुटणें न घट्ट ही गांठ, हट्ट तव सोड
दे बाकि पुरी मत्कारिंचा करण्या दूर-
हा कोहिनूर ज्या गडे ! न जगतीं जोड.

### लाट ३७ वी

तव मिठिचा प्रमदे! मोह मला! अनिवार
प्रति संयोगीं नव स्वर्ग जिथें साकार-
अन स्वर्गी त्या चैतन्य-मधूचा घोंट-
हे ओंठ-चषक तव पाजिति मज प्रतिवार.

### लाट ३८ वी

मज गमे लाडके! झाला तुज आभास
करि अवेळींच वा कुक्कुट मूर्ख रवास!
संपणार कशि ती रात कुठें आतांच-
आरंभ होत ना शुभ अपुल्या नांदीस!

### लाट ३९ वी

कां उठशि सुवदने! दिनकर रथिं नच अजुनी
ही प्रभा गमे तुज अरुणाची कां करणी?
नच अरुण-कला ही जादुच तव नयनांची
मिठि सैल न करिं बघ तिमिरालिंगनिं अवनी.

### लाट ४० वी

नच मालविती कां घालुनि फुंकर पणती
येतांचि दिवाकर सन्मुख क्षितिजावरती ?
अन उचितचि तिज हा काल विझाया खास
तें निष्प्रभ जगणें मरणाहुनि कटु जगतीं !

### लाट ४१ वी

तारका अंबरीं निशासमयिं जणु ज्योती
भूभार तमाचा हलका करण्या जळती !
अन नक्कल त्यांची करुनि काजवा दावी
किति अक्कल स्वशिरीं लखखचि इतरां जगतीं.

### लाट ४२ वी

सुत-गुरुस म्हणे कुणि पिता, "तुम्ही जें दिधलें
मत्सुता ज्ञान इतुकेंच न तुमचें सगळें ?"
गुरु वदे, "नदी नित वाहे, परि हा छात्र-
शिरिं पात्र वाहि जें तळींच कीं फुटलेलें".

लाट ४३ वी

कुणि म्हटलें गिरितें धन्य जनक तूं खास
दे कन्या ज्याची जीवन-रस जगतास !
गिरि वदे, 'परी मम सुत ओकुनिया आग-
किति पोळि जीव, जे देति शाप बापास.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६८६३ वि: काव्य
क्रमांक ३६९८ नों दि ५-५-५८

लाट ४४ वी

ना करी वरुनि जों वरुण-राज जल-वृष्टी
करि टाहो तोडुनि जीव कोकिला कष्टी !
अन आर्त-रवें त्या मोहित रसिका वाटे-
हा अखंड घुमुं दे राग कोकिला-कंठीं.

लाट ४५ वी

होतांचि वृष्टि तो दर्दुर उल्लासांत
करि वर्षा-स्वागत गाउनि उत्सव-गीत !
अन हर्ष-रवें त्या पीडित रसिका वाटे,
नच पाही दैवा ! अधिकचि अमुचा अंत !

लाट ४६ वी

त्या कुक्कुटास कुणि म्हणे मानसीं गुंग,
'कां तुझ्याच शिरिं हा मान तुऱ्याचा सांग
तो वदे 'आणण्या जाग सुप्त जगतास-
रवि आधिं मीच ना उठुनि मारितों बांग !'

लाट ४७ वी

कधि राणिसही त्या सुसज्ज राज-महालीं
निज दासिचा ये करणें हेवा भालीं
अन झोंपडींत कुणि म्हणे सख्यातें सगुणा,
"जगिं राणिहुनिहि मी राया ! वैभवशाली"

लाट ४८ वी

किति वैभव-शिखरिंहि विझल्या अंतर्ज्योती
किति मानस-कलिका दैन्य-दरिंतही फुलती !
ती प्रीतिचीच ना किमया निर्मी जगिं या-
प्रति नंदन-वन जळत्याहि सहाऱ्यावरती !

लाट ४९ वी

दुर्दैवें घडला घरीं तिच्या उपवास
अन दारिं भिकारी म्हणे. "घाल ह्या घांस"
"करि माफ" म्हणें ती, "घरीं एक ना दाणा"
ठग म्हणें "मागुं चल साथ भीक दोघांस!"

लाट ५० वी

किति भोगित इथलीं सुखें विविध मनिं म्हणती,
'कां होय मानवा आयु अल्प या जगतीं!'
अन कितीक वदती करपुनि जीवन-दाहीं,
'किति बरेंचि ही जर वारी जगिं मुळिं नसती'

लाट ५१ वी

मज गमलें तच्छव नेतां तें पुटपुटलें,
'मद्‌भार वाहण्या तुम्हां श्रमचि बहु पडले
परि कराल तुम्हि मज क्षमा खास ऐकून-
जों श्वास उरीं या शवास मी वाहीलें."

## लाट ५२ वी

कुणि पुसे एकदां शंका निज दुसऱ्यास,
‘तो दया मूर्ति कां निर्मी जो नरकास?’
त्या म्हणे दुजा, ‘जगिं पापरहित ना जीव–
वद स्वर्ग तरी कां निर्मि तोचि मग ईश?’

## लाट ५३ वी

कुणि म्हणे दुज्या, ‘तूं पापें करिशीं लपुन–
बघुं नयेत कुणिही म्हणुनिच ना रे भिउन’
तो म्हणे, ‘भक्ति किति करिशीं उघडयावर तूं
ती बघुनि फसावे भोळयांनिच ना म्हणुन?’

## लाट ५४ वी

कुणि म्हणे, ‘बरें हो जन्मतांच तें मरणें
परि नको मृत्युहुनि कटुतर हें नित जगणें’
अन वदे दुजा, ‘किति झालें असतें छान–
या नरकिं कधिहि तें जन्मासचि नच येणें.’

लाट ५५ वी

कुणि म्हणे, 'जिणें हें कशास असलें सहणें-
निज करींच हो निःश्वास हृदय निज करणें'
त्या पुसे दुजा, 'हो अंतरिं तव विश्वास
कीं करींच निज हो फेरि परत तुज नुरणें ?'

लाट ५६ वी

तूं करिशी देवा ! योग्यचि तें मज ठावें
परि सांग नरा त्या पशु कां त्वां न करावें
ज्या भोजन, निद्रा, भोगाविण जगिं नुरलें
कर्तव्य कराया एकही तन, मन, भावें.

लाट ५७ वी

तव सत्ता प्रभु हो चराचरांवरि पुरती,
तव इच्छेविण ना हालत पानहि जगतीं
मग मानव जो तव कळसचि कौशल्याचा-
करि कर्मे कां जीं पशुलाही लाजविती.

लाट ५८ वी

किति जीवन-चक्रीं भरडुनि सज्जन मरती !
आमरण कुजन किति वैभव-शिखरीं रमती !
मीं कसें म्हणूं ही कृति तव चूकचि देवा !
परि म्हणूं काय त्यां जे मज कां हें पुसती ?

लाट ५९ वी

ज्या फांदिस वारा रिझवुनि डुलवी वृक्षीं-
तिज वादळरूपें तोचि छळुनिया नाशी,
तूं मानव-तरुची फांदी तुज जें हसवी-
जगिं जीवन फसवें तेंचि रडवुनी भक्षी !

लाट ६० वी

कधि रम्य दुरुनि जें दृश्य मला जगिं दिसलें
हो दूर रम्यतेपासुनि निकटीं पटलें
मज गमे जिवा त्या दूर किनाऱ्यावरुनी-
देखतां भुलुनि ही सहलचि करणें रुचलें.

### लाट ६१ वी

नित जपुनि ठेव ही तुझी प्रीतिची ज्योत
विझुं दे न तिची ती प्रशांत, मंगल वात !
करि तेजस्वी तिज स्नेह तुझा निर्मळ
अन पिशाच जणुं तो पीडिल संशय-वात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

### लाट ६२ वी

वनीं वास घडो वा पडो शिरीं आकाश,
कोरडा मिळो वा न मिळो गिळण्या घांस,
पाठीस लागुं दे धुवुनि हात दुर्दैव-
परि स्वप्निंहि न घडो मूर्खा तव सहवास !

### लाट ६३ वी

या त्रयीं मधुनि जगिं कोण अधिक दे कष्ट
वार्धक्य, रोग वा निर्धनता ती नष्ट !
जरि कठीणचि निर्णय, गमे इष्ट तो मृत्यु
ज्या त्रिकुट दुष्ट हें एकजूट दे भेट !

### लाट ६४ वी

उतरती द्रवुनि ते मेघ नभांतुनि खालीं
जगतासि द्यावया जीवन दुःसह कालीं
वर चढे धूळ जन-नेत्रीं व्हाया शल्य-
मन उच्च, नीच या वृत्तींस जन्मा घाली.

### लाट ६५ वी

हो गोड गुणांचा पिंडचि ज्याचा त्यास
निज चक्रीं दैवा ! पिळण्याची तुज हौस,
रस मधुरचि उसळे पिळतां ऊस गुऱ्हाळीं-
नच दिसत तुला हें सत्य अंध तूं खास !

### लाट ६६ वी

उच्छ्वासिंहि ज्याच्या भरला दुर्गुण-वास
तूं लिहिशी दैवा ! तच्छिरिं उच्च निवास
नभिं चढविशि असुरा उत्सुक जो रवि गिळण्या-
नच दिसत तुजसि हें सत्य अंध तूं खास !

## लाट ६७ वी

कुणि अक्कल विरहित हिणवुनि वदला त्यास,
'विद्रूप शिरचि तव करि ज्या टक्कल ग्रास !'
तो वदे, 'न येवो शिरिं तव ही आपत्ति,
खुण केसांची तरि असु दे तव घुमटास.

## लाट ६८ वी

सुख माझें नच जें हांव न त्याची मजला
अन धरणारा ती सुखा हातच्या मुकला
परि धडपड कां मन-विहगा ! उडण्या उंच-
तव पंखिं दम पुरा ज्यास्तव अजुनि न भरला.

## लाट ६९ वी

सुख दुःखाप्रति शिक नीट जगींच्या बघण्या
मन दुर्बिणींतुनि होत दोन टोंकें ज्या,
सुख निकट नि मोठें बघायास तें एक-
अन दुजें, दुःख निज दूर नि लहानचि दिसण्या.

### लाट ७० वी

कुणि म्हणे "जयां तूं सुखवाया श्रमलास
ते रमती विसरुन याच जगीं तव वास!"
तो म्हणे त्यास, "जगिं मीही रमतों नच कां–
विसरूनि तयांस्तव श्रमलों मीं असल्यास!"

### लाट ७१ वी

रे मृत्यो! मनिं मम तुझी न किमपिहि भीति
मिटुं देत नेत्र हे याच क्षणीं बघ प्रचिती!
झोंपेंत दिसतिं तीं स्वप्नें, म्हणुनी कधिं कां–
मी भ्यालों येतां झांपड डोळ्यांवरती?

### लाट ७२ वी

जल लोपें मेघीं रूप निर्मलतर घ्याया
हो बीज वृक्ष द्यावया पुष्प, फल, छाया
मग भ्यावें कां मीं मृत्युस जो मज देई–
निज कार्य कराया शक्ति नवी, नव काया.

लाट ७३ वी

तें रूप गिरीचें दुरूनि रम्यचि सारें
परि बघतां जवळुनि मन हो जड भय-भारें
अन दुरूनि मज जो भयाण गमला अंत-
जरि निकट आज तद्रूप न भिवडविणारें!

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
अनुक्रम 36883 वि: काव्य
१६९८ नों दि ५/८/५८

लाट ७४ वी

शैशवींहि मन्मन भीतिग्रस्त हो भारी
रविराज्य सरुनि जैं येत निशा अंधेरी
परि यौवनिं पूर्णचि निर्भय मी प्रतिरात-
हों उत्सुक बघण्या गम्मत नभिं जी न्यारी.

लाट ७५ वी

मन यौवनिं रमलें भोगित विषय-विलास
परि मृत्युभय करी अंतरिं त्यासि उदास
जरि यौवन संपुनि जीवन-संध्या आज-
नच मृत्यु-निशा-भय करि या मानसिं वास.

लाट ७६ वी

मज्जीवा! अंतीं येतां क्षण तो क्रूर
करणार खास जो तुला कुडींतुनि दूर-
ही कुडी तदा जर वेडी व्यर्थ रडेल-
दे तूंचि सुबुद्धा! धीर तिला भरपूर.

लाट ७७ वी

मज्जीव-खगा! म्हण कुडीस तूं वर उडतां,
'सिठि सोड गडे! बघ आला क्षण हा सरता
'नच खंत करीं तूं गोड व्हावया अंत
'मज बघुं दे मुख तव शेवटचें लव हसतां.'

लाट ७८ वी

या महालिं आज न थाट कालचा मस्त
गत यौवन अन हो आरासहि ती लुप्त!
परि आंत जोंवरी बुद्धिदीप तो तळपे-
या हानीची मज किमपिहि नाहीं खंत.

लाट ७९ वी

मम नंदा-दीपहि मंदावुनि, जीवास
जरि घडविल तिमिरीं लाजिरवाणा वास
मन्मना ! मुक्त मम जन्म-सख्यातें करण्या-
अमलांत आण झणि बेत आपुला खास.

लाट ८० वी

नच दुर्गांतरिं या प्रवेश तुज हो काला !
करि द्वेष-भरें त्या बाह्य तटिंच निज हल्ला.
हो आंत माझिया प्रांत त्यावरी राज्य-
करि शक्ति, तिजपुढें डाव तुझा रे हरला !

लाट ८१ वी

जाणार कुठें तूं पुसा न मज कुणि कांहीं
तो जाणें जो मद्‌भार शिरीं नित वाही
अन सूत्रधार जो सजवि मला निज हस्तें-
भूमिका नवी मम करण्या नव बळ देई !

लाट ८२ वी

कृति पाशवि जगिं या करिती मानव कांहीं
तिज बघुनि प्रभुवरा ! शंका मन्मनिं ये ही—
किं क्षमा असावी-हृदयें हिंस्त्र पशूंची
तव नजर चुकीनें भरलीं या नर देहीं !

लाट ८३ वी

ही शक्ति विपुल तुज देणाऱ्याचा हेतू-
त्या दिव्य मूर्तिची प्रभाच व्हावें जगिं तूं
परि बघुनि तुझी रे कृति ही लाजिरवाणी-
झणि तुटतिल त्याचे सर्वेहि आशातंतू !

लाट ८४ वी

'जगिं मानव सारे वानर-वंशज असती'
नच ठावें मज हें म्हणणारे कां म्हणती
परि बघुनि गमे कितिकांच्या मर्कट-लीला-
हे भावि कपींचे पूर्वज निःश्चित जगतीं !

लाट ८५ वी

तव धर्म असूं दे हिंदू, मुस्लिम, क्रिस्ती,
पुजिं ग्रंथराज तूं वा कर धारण कश्ती,
तो एकचि ना जो निर्मी प्रेमें सर्वां:-
बाह्यांग भिन्न, निज दिव्यांशाच्या मूर्ति.

लाट ८६ वी

तूं कशास करिशी मूर्खा मंदिरिं वारी?
हरि तुझा आज बघ तुझ्याच ये शेजारीं
नच आप्त, मित्र ज्या तत्त आज रे साच-
हो विप्र-हरिच तव रुग्ण-रूप-अवतारीं.

लाट ८७ वी

कधिं सरितेचा जरि शुष्क झरा उगमांत
जल निश्चल उरतें कुठें तरी डबक्यांत
अन आशेचीही उब नुरतां अस्तित्वीं-
कधिं निर्बल धुमसे श्वसन-क्रिया हृदयांत.

### लाट ८८ वी

जरि अंत पावती सारे जीवन-हेत
करि जीव आयु-पथिं चलन-कार्य दिनरात
नच उरतां थेंबहि पणतिंत त्या तेलाचा
करि जलन-कार्य जशि स्नेह शून्य ती वात.

### लाट ८९ वी

तूं तेजस्वी रे ताऱ्या ! दीप नभींचा-
कां पडसि खालिं व्हावयाचि पत्थर भूचा ?
मज गमें तुज चढे उच्चत्वाचा मात,
करि अधःपात जो सर्वेहि गुणवंतांचा.

### लाट ९० वी

कशि नटूनि सरते ! नाचत मुरडत जाशी-
कधि गिरी दऱ्यांतुनि गुंजित गीत मनाशीं
किति शून्यहृदय पाषाण करिति तुज रोध
त्या चकवुनि सागर-हृदयीं तन्मय होशीं !

लाट ९१ वी

तव वदन असें कां रडवें! मुख कां सुतकी?
तुज चिंता त्वत्प्रस्थान स्वर्गीं वा नरकीं?
हो स्वर्गवासि वा प्रयाण करिं मसणांत
परि दाविशि अम्हां नरकचि कां इहलोकीं?

लाट ९२ वी

तूं निरंतरचि रे मृत्यु-मंत्र कां जपसी?
ये मृत्यु एकदां सदाचि कां तूं रडसी?
तुज जीवित प्रभु दे सस्मित जगण्यास्तव ना
मग रुदन कार्य-क्रम कां नित जागिं अनुसरशी?

लाट ९३ वी

अम्हि शवास त्याच्या साश्रु अग्नि जैं दिधला
तो जळुनि धूपसा धूर नभांतरिं चढला
हो सुगंध-गुण तद्रक्षेंतहि निःशंक
गुण-सुगंध त्याचा जसा मन्मनीं भरला.

### लाट ९४ वी

हीं कुसुमें कोमल, रम्य बघुनि भूवरती–
मन मोहुनि अमुचें, लुप्तहि झणि जीं होतीं
मज गमें मुळें भू लपवी उदरीं अमुची
त्यांच्याच मातिंतुनि जन्म फुलें हीं घेतीं !

### लाट ९५ वी

मम अंत होउं दे असतां प्रिय जन भवती
अन मदंतरीं ती ओळख–ज्योतहि जळती
मग हसतचि येथुनि जाइन वर कळवाया
प्रिय–जनांस तिथल्या काय ? कसें ? हो जगतीं

### लाट ९६ वी

जन नेतिल मच्छव द्याया अग्निस जेव्हां
तो समय असूं दे सुखदचि, शीतल देवा !
अन जळतां मी मम भार वाहणाऱ्यांचा–
माझ्याच उबेनें श्रम–परिहारहि व्हावा !

लाट ९७ वी

त्या पुसती, "जरि तूं वृद्ध तुझी कां वृत्ति
नव तरुणोचित अशि सांग काय तव युक्ति?"
तो म्हणे, "द्वेष करि तरुणासहि त्या वृद्ध-
अन जरठा करि ह्या तरुण प्रीतिची शक्ति".

लाट ९८ वी

कुणि वदे, 'खास, नच प्रवेश हो वृद्धास-
स्वर्गांत प्रीतिच्या, म्हणे हंसत कवि त्यास,
'नच ठावें तुज कां भासहि वृद्धत्वाचा-
'तन्मनास नच हो प्रीति-भक्त जो खास!'

लाट ९९ वी

करिं स्वकीय परकीयांवर साच्या प्रीति
मग नुरेल भासहि बघ भीतीचा जगतीं
करि नित्य भीतिचें पिशाच तिमिरीं वास-
प्रीतिचीच भरुं दे अंतरिं मंगल दिप्ति!

लाट १०० वी

बहु प्रयास केले तुज मी जाणायास
किति सुटल्या गांठी तुझी न सुटणें खास
तुज विषयिं प्रभो मज हेंचि उमगलें सर्व-
तूं विषयचि दुर्गम हो मम अल्पमतीस.

लाट १०१ वी

मज वेळ कुठें तव मंदिरिं करण्या वारी
मद्गृहीं उपाशी किति अन किति आजारी!
जरि म्हणसी सर्वां तारिशि, मारिशि तूंच
मग तार नीट वा नीट तरी त्यां मारी.

लाट १०२ वी

करिं शोक न मित्रा! गेला 'काल' तयाचा
नच धरहि "उद्याचा" ध्यास न जन्महि ज्याचा
त्या "काल" आणि या "उद्यां" मधीं बघ रोख-
हा "आज" लूट त्या जों न "काल" हो त्याचा!

## लाट १०३ वी

जन म्हणोत कांहीं मजविषयीं मीं नुरतां,
मम भल्या बुऱ्याचा मलाहि ठाव न पुरता–
परि शपथचि त्या शिव–सुंदर–सत्य त्रयींची–
त्यांचाच नित्य मी जगीं हों गुण–उद्‌गाता !

## लाट १०४ वी

स्मरतांचि तुज प्रभो ! आपत्ती नुरतात
ये प्रचीति जगीं ज्यां वदले उचितचि संत
करीं संतचि मज मग पाठविं शत आपत्ती–
तत्पूर्वि नातरी करितिल त्याच ममांत !

## लाट १०५ वी

मज मान्य कितिकदां प्रभो ! पतन मम घडलें
परि घडतां नच कां मन्मनिं कांटे रुतले ?
अन गमें तुजसि जरि दंड न मज हा पुरता ?
किति दया–दान तुज करण्या छानचि झालें !

लाट १०६ वी

तुज किती विनविलें जा न दूर क्षण एक
मम मनांतूनि, त्वां कां न ऐकली हांक?
अरि क्षणिंच त्या करी प्रवेश बदलुनि वेष
मग दंड मला कां चूक न मम निःशंक.

लाट १०७ वी

मत्पापें घडलीं कितीक कीं मज ठावें,
तुज क्षमा कराया प्रभो! न जड या भावें
अन कितीक पुरतें बळ मोहा जिंकाया-
नच दिलेंस म्हणुनिच, कां मग शासन व्हावें?

लाट १०८ वी

तूं क्षमा-सिंधु ही देवा! तव रे ख्याति
मी पाप-नगचि, नग अजोड साऱ्या जगतीं
हो निकष-दगड मी, पारख तव होणार
नच मळो सुवर्णा! त्रिभुवनिं तव जी कीर्ति.

लाट १०९ वी

तव इच्छा ही कीं उच्च, नीच ना गणतां
मी सर्वां ठायीं सदा धरावी समता!
मीं चुकलों परि तूं पापी पुण्यात्म्यांस-
सम कृपा-घांस दे भेद-भाव ना धरतां.

लाट ११० वी

मज मान्य बरें कीं करण्या दुर्बल-सेवा
तूं द्यावी मज पुरि शक्ति नि बुद्धिहि देवा!
परि दुजें तयाहुनि मज हो अधिकचि मान्य-
जगिं शून्यचि दुर्बल औषधासही व्हावा!

लाट १११ वी

जरि जीवनिं मी या बहुविध दाहें तप्त
हो लाभचि मम निःशंक हवनिं या गुप्त!
जळणें न हेम मम जरि वितळे, उजळून
मज अचुकचि देइल जन्मांतरिही साथ!

लाट ११२वी

पातला जरी तो अंत न मन्मनिं खंत
नेणार कोण मज पुंजिविना मम साथ ?
अन पाहुनि आंतिल संचय नेतिल मजला
मद्‌गौरवार्थ म्हणि सादर दरबारांत.

लाट ११३ वी

मन्मनीं शिराया द्वेष, मोह वा गर्व
टपतांच दुत तव घेतिल ना प्रभु ! धांव ?
अन सुसज्ज करुनी सर्वेहि नाकेबंदी–
त्यां म्हणतिल ना, "नच इथें तुम्हां शिरकाव."

लाट ११४ वी

मज हे प्रभु ! कर सत्कृति जे करण्या स्फुरती
अन पदचि कधिहि जे सुपथाविण नाचरती
परि विसर न द्याया मज तूं नेत्र सुदक्ष
पर-गुण नि दोष मम बघण्या नच जे मिटती !

## लाट ११५ वी

मज दे प्रभु ! मन सच्चिंतनिं नित जें रमतें,
अन हृदयहि जें पर-दुःख-दर्शनीं द्रवतें,
परि विसर न द्याया मज तूं शीर्ष सुबुद्ध-
सुख-दुःखीं तुज जें स्मरण्या नच विसरतें.

## लाट ११६ वी

येणार म्हणुनि तूं मन्मन हर्षोन्मत्त
किति नाचें वेडें गुंजित तव गुण-गीत
येतांचि जवळिं तूं उरेल जाणिव माझी,
मज जवळिं सख्या! कीं दूर एक तुज ज्ञात!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

याच लेखकाचें आगामी साहित्यः-

१ मनीषा (काव्य-संग्रह)

२ वारुणीचा घोंट (खंड काव्य

३ प्रमेचा विश्वास (सामाजिक कादंबरी)

REFBK-0013478

REFBK-0013478